# संगीत शिक्षणातील प्रश्न

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - महाराष्ट्राचे शिक्षण : प्रयोग आणि परंपरा, संपा. एस्. एस्. भोसले,
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंके षष्ट्यब्दीपूर्ती समिती, कराड कोल्हापूर, १९८०)

आज खरे पाहता, दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की आम्हाला संगीतशिक्षणात काही समस्या निर्माण झाल्याची जाणीवच होत नाही.संगीतशिक्षणाच्या प्रशासनातील समस्या हाच आमच्या विचाराचा विषय होतो. पगार, सवलती, अभ्यासक्रम व त्याला मिळणारे तास इत्यादी सर्व बाबींकडे फक्त प्रशासनाच्या दृष्टिकोणातूनच पाहत राहणे हा आमच्या विचारातला दोष आहे. संपूर्णतः निर्दोष, न्याय्य आणि सर्वांगीण विचारांवर आधारित असे प्रशासन सिद्ध झाल्यावर मग आम्ही जर शिक्षणसंबंद्ध गोष्टींचा विचार करणार असू तर देव, अध्यात्म, नैतिकता इत्यादींचा विचार फक्त म्हातारपणी करावयाचा असतो अशी हास्यास्पद भूमिका घेण्यासारखे आहे. शिक्षणासंबंधीचा विचार ही सतत करावयाची गोष्ट आहे. शिक्षण, कलाशिक्षण, प्रयोगसिद्ध कलांचे शिक्षण आणि संगीताचे शिक्षण अशी कमी कमी होत जाणाऱ्या परिघाची वर्तुळे आपल्यासमोर सतत राहिली पाहिजेत. अशा व्यापक संदर्भात विचार न झाल्यास प्रशासकीय सुधारणा ठिगळे लावण्यापलीकडे पोचू शकणार नाहीत, हा इषारा आपण ध्यानात ठेवणे जरूर आहे.

**व्यापक तत्त्वज्ञानाचा अभाव**

आपल्या संगीतशिक्षण-विचारास व्यापक संदर्भ नसल्यामुळे आमच्यापाशी संगीत शिक्षणाचे असे कोणतेही तत्त्वज्ञान नाही या कारणाने संगीतशिक्षणाची विविध उद्दिष्टे, त्यानुसार बदलाव्या लागणाऱ्या शिक्षणपद्धती, संगीताच्या प्रयोगसिद्ध स्वरूपामुळे आवश्यक ठरणारा शिक्षणतंत्रातला लवचिकपणा यासारख्या सर्व बाबींकडे आपले दुर्लक्ष होते. रोगनिवारणात संगीत वापरणाऱ्यांना संगीताची कोणती उद्दिष्टे संगीतशिक्षणातून आपण स्पष्ट करून दाखवितो? श्रमपरिहारार्थ संगीत वापरणे म्हणजे काय व ते कसे करावे याचा संगीतशिक्षणातून उलगडा होतो का? अजूनही रागांची संख्या कमी-जास्त करणे, वा तानांचे कमी-अधिक प्रकार शिकविणे, अभ्यासक्रम बदलणे ही आपली बालिश समजूत कायम आहे. संगीत म्हणजे शास्त्रीय संगीत, संगीत शिकणारा म्हणजे गाणे-बजावणे करू शकण्यापर्यंत पोचणारा, संगीत रसिक म्हणजे संगीताचे शिष्टमान्य, रूढ प्रकार समजणारा अशा सोप्या आणि निरुंद समीकरणांनी अजूनही आमची संगीत-संविद सजविलेली असते. समाजजीवनात सहभागी होणारे वर्ग बदलत आहेत, या सर्वांच्या सांगीतिक गरजांच्या आवाक्यावर आपल्या संगीताचे अंतिम स्वरूप अवलंबून असते आणि असे संगीताचे स्वरूप निश्चित होताच शिक्षणपद्धती, तंत्रे इत्यादी सर्व संलग्न बाबी बदलतात याचे भान राखणे जरूर आहे. आपल्याजवळ संगीतशिक्षणाचे तत्त्वज्ञान नाही, आहे ते फक्त शास्त्रीय संगीत शिकविण्याचे परंपरागत ज्ञान.

**कलावंत शिक्षकांची जरुरी**

संगीतशिक्षणाचे तत्त्वज्ञान आपल्याकडे मूळ न धरण्याचे कारण आमचे शिक्षक.संगीताच्या प्रयोगसिद्ध स्वरूपामुळे, संगीतात प्रत्यक्षतः गोवल्या न गेलेल्या व्यक्तींकडून संगीतशिक्षणाच्या तत्त्वज्ञानात भर पडणे कठीण आहे. तेव्हा संगीतव्यवहारांशी प्रत्यक्षतः संबंधित असलेल्या व्यक्तींनीच ही जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न मनःपूर्वक केला पाहिजे. अनेक संगीतकार फारसे शिकलेले नसतात. पण खरी दुर्भाग्याची गोष्ट अशी, ते शिकलेले असूनही फारसा फरक पडला असता अशी परिस्थिती नाही. कारण

तथाकथित सुशिक्षित संगीतकार आणि अशिक्षित संगीतकार या दोघांचाही मूळ दृष्टिकोण विचाराला पारखे मानण्याचा आहे. इतिहासात केव्हातरी संगीतशास्त्र आणि कला एकमेकांस विरोधी आहेत अशी भूमिका कलाकारांनी सोयीसाठी घेतली. "वह तो पंडत है" हा शिवी म्हणून वापरला जाणारा वाक्प्रचार म्हणजे कलाकारांनी आपली जबाबदारी झटकून टाकून पळ काढण्याचा पुरावा आहे. भरत कलाकार होता म्हणून युगप्रवर्तक शास्त्रकार होता; शार्ङ्गदेवाचे तसेच असले पाहिजे. शास्त्र म्हणजे शब्दपांडित्य नसते. शास्त्र म्हणजे विचारप्रवणता आणि विचार गप्प बसू देत नाही. तो नेहमीच क्रियाशील बनवितो. म्हणून विचाराने क्रिया सुधारते. संगीतविषयक विचार संगीतक्रियाही सुधारतो. कलाकारांनी कलेविषयी विचार केल्याने कलेच्या शिक्षणाच्या स्वरूपात जितका बदल घडेल तितका दुसऱ्या कशाने घडणे संभवनीय वाटत नाही. ताल आधी शिकवावा की लय, राग आधी शिकवावा की गीत; सामूहिक शिक्षणाचा उपयोग कितपत व कसा करता येईल, ध्वनिमुद्रित संगीताचा उपयोग किती व कोणत्या प्रकारे करता येईल, यासारख्या अनेक प्रश्नांवर अधिक फलदायी विचार कलाकार करू शकेल; कारण यासारख्या सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीची पूर्वशर्त म्हणजे संगीतविषयक एक मूल्यनिर्णय घेणे ही होय; आणि या निर्णयापर्यंत जास्तीतजास्त बिनचूक पोचणे शक्य व्हावे याच दृष्टीने कलावंताचा अभ्यास झालेला असतो. आजकाल शिक्षणाची साधने वाढली आहेत पण (त्यानुसार पद्धती बदलल्या नाहीत. कलावंत हा कधीतरी साधक असतो आणि साधकावस्थेत कशाकशाचा उपयोग होतो याची नेमकी जाणीव त्याला होणे क्रमप्राप्त असते. शिक्षणपद्धतींच्या जडणघडणीत कलावंताचा सहभाग अधिक व सर्व पातळ्यांवर हवा हे आज विसरल्यात जमा आहे. त्यांच्या अनुभवांचे वा सिद्धांतांचे भाषांतर करून घेणे कदाचित आवश्यक भासेल. पण तरीही ज्याचे भाषांतर होणार त्या मूळ आशयाला अधिक कस असेल ही गोष्ट विसरून चालणार नाही.

**संगीतसंविद् आणि श्रवणक्रियेतील सहेतुकता**

एक अतिशय महत्त्वाचे वळण आमच्या संगीतशिक्षणविषयक विचारास मिळावयाला पाहिजे, आणि ते कलावंताच्या सक्रिय सहभागामुळे सहज शक्य व्हावे असे वाटते. आमच्या शिक्षणाचा मोहरा संगीतसंविद्, अधिक सूक्ष्म आणि चैतन्यशील करण्याकडे वळला पाहिजे. आपण विद्यापीठांत वा इतरत्र काय करतो? एक तर वर्षांच्या भाषेत प्रावीण्य मोजतो किंवा अभ्यासक्रमाच्या घटकांच्या भाषेत ते मापतो. एक विचित्र ढापणे लावलेली संगीतसंविद् यामुळे तयार झालेली दिसते. अशा शिक्षणाचे संस्कार झालेले विद्यार्थी संगीताचे संस्कार घेऊन बाहेर न पडता अभ्यासक्रमाचे चष्मे वा पांगुळगाडे घेऊन बाहेर येतात. अभ्यासक्रमाबाहेरचे संगीत त्यांना संगीत म्हणून जाणवत नाही, मग ओळखणे दूरच राहिले. त्यांना स्वर ओळखतात. पण आकर्षक, अर्थपूर्ण ध्वनि ओळखू येत नाहीत. यांना लेबले कळतात, पण मूळ वस्तू समोर आली तरी कळत नाही. ध्वनींना प्रतिसाद देणे, त्यांच्याशी संपर्क साधणे ही संगीतकाराला साधणारी किमया यांना अजिबात अवगत नसते. कारण संगीतातले साचे आणि ध्वनींच्या आकृत्या यातल्या फरकाचे त्यांना भान नसते. कान गमावलेली माणसे संगीतकार होऊ शकत नाहीत. आपल्या संगीतशिक्षणात श्रवणविद्येला महत्त्व हवे तरच संगीतसंविद् सूक्ष्म, संपन्न आणि तरल होईल. आजच्या ध्वनिप्रदूषणाच्या काळात श्रवणसंवेदन बोथट होण्याचा धोका केवळ संभाव्य राहिलेला नसून प्रत्यक्ष झाला आहे. श्रवणशक्तीची जपणूक कसोशीने व सहेतुक केली पाहिजे. संगीतसंविद् आणि श्रवणक्रिया यांचे नाते ध्यानात घेऊन आणि संगीतशिक्षणाचे उद्दिष्ट, अभ्यासक्रम, रागसंख्या, तानप्रकार इत्यादींपुरते मर्यादित नाही अशा ठाम दृष्टिकोणातून शिक्षणप्रक्रिया सुधारली गेली पाहिजे.

**सांगीतिक शास्त्रांचे सांगीतिक आकलन**

म्हटले तर आपल्या सर्व सांगीतिक शिक्षणव्यवहाराचे अकर्तेपण एका मूलभूत दोषामुळे उद्भवते असे मानता येईल. संगीताच्या सर्व औपपत्तिक विषयांचे होणारे अ-सांगीतिक विवेचन असे या दोषाचे वर्णन करता येईल. संगीतेतिहास, संगीतशास्त्र, संगीताचे मानसशास्त्र, संगीताचे पदार्थविज्ञान इत्यादी सर्व विषय आपण प्रत्यक्ष संगीतव्यवहारांशीसंबंध न जोडता शिकवितो. संगीतेतिहास म्हणजे सांगीतिक घटनांची जंत्री म्हणून न शिकविला जाता सांगीतिक कल्पनांचा (idea) क्रमवार विकास म्हणून समोर ठेवला गेला पाहिजे. संगीतशास्त्र हे संगीताचे व्याकरण खरे. तेव्हा ते संगीतव्यवहाराच्या नेहमी मागे राहणार हे स्वाभाविक आहे. पण त्यातही संगीतव्यवहाराचे रूढीस मान्य संगीतरूप प्रतिबिंबित होत असल्याने संगीताच्या उत्क्रांतीचे गोठविलेले दर्शन त्यातून घडत असते.अशा तऱ्हेने त्याचे चित्र उभे न करता संगीतसंज्ञांच्या नोंदी पुढे करण्याचे आपण केव्हा सोडणार? मानसशास्त्र आणि पदार्थविज्ञान यांचे शिक्षण देतानाही आपल्या प्रत्यक्ष संगीतव्यवहाराचा संबंध न जोडल्याने अन्वय न लागणारी माहिती म्हणून यांचे शिक्षण मनात नुसते कोंदले जाते. यामुळे अनेक ज्ञानशाखांकडून कारभार घेण्याचा प्रत्येक कलेचा हक्क संगीत गमावून बसते. प्रयोग, विचार, शिक्षण, प्रसार आणि रक्षण यासारख्या सर्व अंगांबाबत संगीतात जो साचेबंदपणा शिरला आहे त्याचे कारण संगीतविषयक औपपत्तिक भागांकडे पाहण्याची आपली कोती दृष्टी हे होय. संगीतशिक्षणात शास्त्रीय विषय फार झाले आहेत ही ओरड चुकीची आहे. शास्त्रीय विषयांचे शिक्षण चुकीच्या पद्धतीने देतो ही खरी चूक आहे. औपपत्तिक विषयांकडूनच कलाशरीराचे पोषण होत असते. त्यांच्याशिवाय कला केवळ कौशल्य बनते.

**इतर प्रयोगसिद्ध कलांशी हातमिळवणी**

काहीशा तात्पुरतेपणे मांडावयाचा शेवटचा मुद्दा म्हणजे संगीतशिक्षणात नाट्य व नृत्य या दुसऱ्या कलांचा समावेश व्हायला हवा हा होय. प्रयोगांतून या कलांचे आविष्कार सिद्ध होतात आणि संपर्कसाधनाचे यांचे मार्ग समान असतात, या गोष्टी लक्षात घेता असा समावेश विचारार्ह ठरावा. अनेक कलांचा संयोग होणाऱ्या कलांचे शिक्षण तुलनेने पाहता बऱ्याच अरुंद क्षेत्रात फिरत असलेले दिसते.लयीचे नृत्याशी असलेले अंगभूत नाते, भाषेच्या कलात्म उपयोगाचा नात्याशी असलेला अंगभूत संबंध या दोनच गोष्टी जरी ध्यानात घेतल्या तरी संगीतशिक्षणाचा पाया नाट्य-नृत्याच्या मदतीने कसा मजबूत करणे शक्य आहे याची कल्पना करता येईल. आपल्या संवेदनशीलतेचा लवचिकपणा वाढविणे हाही फायदा यातून सहजगत्या मिळतो हे लक्षात येण्यासारखे आहे.

संगीतशिक्षणाची सध्या कोंडी झाली आहे. संगीताचे सामाजिक स्थान काय याविषयीच्या संकुचित कल्पनांकडे या कोंडीचे लोण पोचविता येईलही! पण या पळवाटेपेक्षा संगीतशिक्षणाकडे पुन्हा वळून पाहणे हा मार्ग उचित होय.